# प्रेसनोट दि. २६/०६/२०२०

## लॉकडाऊन काळामध्ये धुमाकुळ घालुन जबरी चोरी करुन भूमिगत झालेला अट्टल गुन्हेगाराच्या गुन्हे शाखा, युनिट ५ ने आवळल्या मुसक्या

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड श्री संदिप बिष्णोई सो यांनी राबविलेल्या पाहीजे फरारी मोहीमे अंतर्गत श्री. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड यांनी पाहीजे फरारी आरोपी शोधणेकरीता गुन्हे शाखा युनिट ५ कडील अधिकारी व कर्मचारी यांना आदेशीत करुन सुचना दिल्या होत्या. आदेशाप्रमाणे कारवाई करीत असताना गुन्हे शाखेकडील **पोलीस कर्मचारी गणेश मालुसरे** यांना बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, कुख्यात गुन्हेगार शेऱ्या उर्फ ऋशीकेश राजु अडागळे हा सेंट्रल चौक, देहुरोड येथे येणार असुन तो गुन्हे करण्याचे तयारीमध्ये आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमीचा आशय श्री.बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ५ यांना कळविला असता त्यांनी गुन्हे शाखा युनिट ५ कडील सपोनि राम गोमारे व पोलीस कर्मचारी गणेश मालुसरे, मयुर वाडकर, दत्तात्रय बनसुडे, सावन राठोड, संदिप ठाकरे यांचे एक शोध पथक तयार करुन त्यांना योग्य त्या सुचना व मार्गदर्शन करुन कारवाई करणेबाबत आदेशीत केले.

त्यावर सदरचे शोध पथक मिळालेल्या बातमीचे ठिकाणी जावुन दबा धरुन थांबलेले असताना शेऱ्या उर्फ ऋशीकेश राजु अडागळे हा तेथे आला त्याला पोलीसांचा संशय आल्याने तो तेथुन पळ काढु लागला त्यास शोध पथकाने शिताफिने पकडुन ताब्यात घेवुन नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव **शेऱ्या उर्फ ऋशीकेश राजु अडागळे, वय २१ वर्षे, धंदा मजुरी, रा पदमावती मंदिरासमोर, मौजे उर्से, ता. मावळ, जि पुणे** असे असल्याचे सांगितले. पोलीस अभिलेख तपासला असता तो **देहरोड पोलीस स्टेशन गु.र.नं. १७१/२०२० भादविक ३९२, ५०४, ५०६, ३४** या गुन्हयातध्ये पाहिजे असल्याचे समोर आले आहे. शेऱ्या उर्फ ऋशीकेश राजु अडागळे याचेवर पुढीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत

1. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं १०६७/२०१९ भादविक ३९५, ३९७, ५०४, ५०६, ३४**
2. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं ५९६/२०१७ भादविक ३०७, ५०४, ५०६, ३४**
3. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं २६७/२०१७ भादविक ३९२**
4. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं ६३५/२०१८ भादविक ३६३, ३६४(अ), ५०४, ३४, ३४३**
5. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं ३३/२०१७ भादविक ३२४, १४३, १४७, १४८**
6. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं १२४/२०१७ भादविक १४३, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६**
7. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं ५८०/२०१७ आर्म ॲक्ट ४(२५)**
8. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं २९९/२०१८ आर्म ॲक्ट ४ (२५)**
9. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं ५९६/२०१८ आर्म ॲक्ट ४(२५)**
10. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं ३३३/२०१८ मु.पो.का.क. ३७(१)(३), १३५**
11. **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं ३५२/२०१८ मु.पो.का.क. ३७(१)(३), १३५**

शेऱ्या उर्फ ऋशीकेश राजु अडागळे यास देहरोड पोलीस स्टेशन गु.र.नं. १७१/२०२० भादविक ३९२, ५०४, ५०६, ३४ चे पुढील तपासकामी देहुरोड पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा.श्री संदिप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा.श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त गुन्हे मा.श्री राजाराम पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.बाळकृष्ण सावंत, सहा पोलीस निरीक्षक श्री.राम गोमारे व पोलीस कर्मचारी गणेश मालुसरे, मयुर वाडकर, संदिप ठाकरे, सावन राठोड, दत्तात्रय बनसुडे, धनराज किरनाळे, स्वामीनाथ जाधव, फारुक मुल्ला, भरत माने, राजकुमार इघारे, दयानंद खेडकर, श्यामसुंदर गुट्टे, ज्ञानेश्वर गाडेकर, धनंजय भोसले, गोपाळ ब्रम्हांदे, नितिन बहिरट यांनी केली आहे.